# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २३६- २३** **दिनांक : - २७/०७/२०२३**

## अग्नीशस्त्र जवळ बाळगणाऱ्या सराईत गुन्हेगारास अटक पेल्हार पोलिस ठाणेची कामगीरी.

दिनांक २५/०७/२०२३ रोजी २०.०५ वा. च्या सुमारास पेल्हार पोलीस ठाण्याचे सपोनि सोपान पाटील, यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती प्राप्त झाली की, पेल्हार पोलीस ठाण्याच्या हद्दीत हनुमान मंदीराच्या पाठीमागे, धानिवबाग गांगडेपाडा, नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर येथे एक इसम त्यांच्या ताब्यात विना परवाना स्वयंमचलित अग्नीशस्त्र घेऊन येणार आहे.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने सपोनि सोपान पाटील यांनी पेल्हार पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. वसंत लब्दे यांना कळविले असता त्यांनी सदर बातमीची पडताळणी करणे करीता सपोनि सोपान पाटील, पोहवा/जालिंदर मुनफन, पोहवा/भाईदास शिंगाणे, पो.अं/राहुल कर्पे, पो.अं/अविनाश पाटील असे पथक तयार करुन त्यांना तात्काळ घटनास्थळी रवाना केले. सदर ठिकाणी इसम नामे - दिव्यांशु संदीप सिंग, वय २२ वर्षे, रा. विनोंद सिंग यांची बिल्डींग, रुम नं. ०३, सी मार्टचे जवळ, गौराईपाडा, नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर मुळ रा. ग्राम तसेरुपुरेदयाल, पोस्ट मारीपुर, बजार कसेरुबजार, पुलीस थाना सुरेरी पोलीस ठाणे, तहसिल मडीयाहु, जि. जोनपुर, राज्य - उत्तरप्रदेश हा संशयास्पद हालचाली करतांना मिळुन आल्याने पोलीस पथकाने सापळा कार्यवाही करुन त्यास ताब्यात घेऊन त्यांची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्यांच्या अंगझडतीमध्ये त्यांच्या ताब्यात एक स्वयंचलित ५०,०००/- रुपये किंमतीची कानपुर बनावटीची रिव्हॉल्वर, ३,०००/- रुपये किंमतीचे ०६ जिवंत काडतुसे व १,०००/- रुपये किंमतीचा सॅमसंग कंपनीचा ०१ बंद स्थितीतील मोबाईल असा मुद्देमाल मिळुन आला आहे. सदरबाबत पेल्हार पोलीस ठाण्यात गु. र. क्र. ६९३/२०२३ भारतीय हत्यार कायदा १९५९ चे कलम ३, २५ सह महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चे कलम ३७(१), (३), १३५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि सोपान पाटील हे करत आहे.

अटक आरोपीत दिव्यांशु संदीप सिंग यांच्या विरोधात यापुर्वी देखील वालीव पोलीस ठाणेत गु.र.क्र. ६८८/२०२१ भादविस ३९४, ३४ अन्वये गंभीर स्वरुपाचा गुन्हा नोंद असुन तो सराईत गुन्हेगार असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली पेल्हार पोलिस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. वसंत लब्दे,पोनि. श्री. विजय पाटील (गुन्हे), सपोनि सोपान पाटील, पोहवा जालिंदर मुनफन,भाईदास शिंगाने, पो.अं. राहुल कर्पे, पो.अं. अविनाश पाटील यांनी कामगिरी केली आहे.

-----000-----